वरळी, नायगाव व ना.म.जोशी मार्ग बी.डी.डी. प्रकल्पामधील पोलीस शासकिय निवासस्थानात वास्तव्यास असलेल्या दि.०१.०१.२०११ नंतरच्या पोलीस/ त्यांचे वारसदार यांच्याकडून पुनर्विकसित मालकी हक्काच्या सदनिकेकरिता आकारावयाच्या बांधकाम खर्चाच्या रक्कमेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्र.अनौसं क्र.१९/२०२४/पोल-७ (E-१८१९३५८)
मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२
दि.२९ ऑक्टोबर, २०२६

संदर्भ - १) गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय क्र. बैठक-२०२१/प्र.क्र.१४८/गृनिप, दि.१८.०८.२०२१
२) गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय क्र. बैठक-२०२१/प्र.क्र.१४८/गृनिप, दि.३०.०८.२०२२
३) गृह विभाग शासन ,पत्र क्र. अनौसं क्र.१९/२०२४/पोल-७ ,दि.१४.१०.२०२४

प्रस्तावना -

वरळी, नायगांव व ना.म. जोशी मार्ग या तिनही बी.डी.डी. चाळींमधील पोलीस विभागाच्या शासकिय सेवानिवासस्थानांचा देखील पुनर्विकास होत असल्याने या पुनर्विकास प्रकल्पांतर्गत, दि.०१.०१.२०११ रोजी पर्यंत सेवानिवासस्थानात वास्तव्यास असलेल्या पोलीस कर्मचारी व त्यांचे वारसदार यांना पुनर्वसन सदनिकेचे मालकी तत्वावर वितरण करण्याबाबत संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली. तसेच या मालकी तत्वावर देण्यात येणाऱ्या पुनर्वसित सदनिकांच्या बांधकाम खर्चाची रू.१५ लक्ष इतकी रक्कम पोलीसांकडून/वारसांकडून आकारण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला आहे. तदनंतर दि.०१.०१.२०११ नंतर सेवानिवासस्थानात वास्तव्यास असलेल्या पोलीस कर्मचारी यांना पुनर्वसन सदनिकेचे मालकी तत्वावर वितरण करण्याबाबत विनंती अर्ज प्राप्त झाले. त्यावर म्हाडामार्फत वरळी, नायगांव व ना.म. जोशी मार्ग या तिनही बी.डी.डी. पुनर्विकासानंतर उर्वरित ५३८ पुनर्वसन सदनिका गृह विभागास प्राप्त होणार असल्याचे दिसून आले. त्यामुळे पोलीस विभागास प्राप्त होणाऱ्या ५३८ पुनर्वसन सदनिका दि.०१.०१.२०११ नंतर वास्तव्यास असलेल्या कर्मचाऱ्यांना मालकी तत्वावर देण्याबाबतच्या विनंतीच्या अनुषंगाने पुढील निर्णय घेण्याबाबत गृहनिर्माण विभागाने या विभागास प्रस्तावित केले .

त्यानुसार संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये, दि.०१.०१.२०११ नंतर बी.डी.डी. चाळीमध्ये सेवानिवासस्थानात वास्तव्यास असलेल्या व अपात्र ठरविण्यात आलेल्या सेवानिवासस्थानातील पोलीस कर्मचाऱ्यांना बी.डी.डी. चाळ पुनर्विकास प्रकल्पांतर्गत बांधकाम खर्च आकारून ५०० चौ.फुटाच्या सदनिका मालकी तत्वावर देण्यास मान्यता देण्यात आली. याप्रमाणे पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी पोलीस शासकिय निवासस्थानात वास्तव्यास असलेली वरळी-१२३, नायगाव-८४,

ना.म.जोशी-१६ अशी एकुण २२३ पात्र पोलीसांची यादी म्हाडास सादर केली असून उर्वरित ३१५ निवासस्थान पोलीस विभागाच्या ताब्यात असल्याचे कळविले होते. यावर म्हाडा कार्यालयाने प्रस्तावित केल्याप्रमाणे वरळी, नायगांव व ना.म. जोशी मार्ग बी.डी.डी. प्रकल्पातील ५०० चौ. फुट पुनर्वसन सदनिकांच्या बांधकाम खर्चाच्या रक्कमेबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत गृहनिर्माण विभागाने या विभागास विनंती केली. त्यानुसार सदर बांधकाम खर्चाच्या रक्कमेबाबत शासन निर्णय काढण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

गृह विभाग, शासन पत्र दि.१४.१०.२०२४ अन्वये दिलेल्या मंजूरीनुसार ५३८ पुनर्वसन सदनिकापैकी दि.०१.०१.२०११ नंतर बी.डी.डी. चाळीमध्ये पोलीस शासकिय निवासस्थानात वास्तव्यास असलेल्या पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी पात्र केलेल्या वरळी-१२३, नायगाव-८४, ना.म.जोशी-१६ अशी एकुण २२३ शासकिय निवासस्थानातील पोलीस अधिकारी /कर्मचारी वा त्यांच्या वारसदार यांना, ५०० चौ. फुट पुनर्वसन सदनिकेकरिता गृहनिर्माण विभागाने ठरविलेला,

वरळी	रू.१.४८/- कोटी
नायगाव	रू.७२.२५/- लक्ष
ना.म.जोशी	रू.८६.३०/- लक्ष

इतका बांधकाम खर्च आकारून मालकी तत्वावर वितरण करण्यात यावे.

२. उर्वरीत ३१५ पुनर्वसन शासकिय सदनिका/निवासस्थाने पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या ताब्यात देण्यात यावीत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१०२९१६४९२१५८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GAJANAN PRAKASH SHANKARWAR

Digitally signed by GAJANAN PRAKASH SHANKARWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Home Department, 2.5.4.20=987E36AD72FB433906CC19C0BE227EB11F0FA202FB7044FBE69FFB8D54548E97, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=53B2DD719B747294E93931B5F3CBD67330453B57A047DB3D857CC6A0CB613C4F, cn=GAJANAN PRAKASH SHANKARWAR
Date: 2026.10.29 16:50:17 +05'30'

(गजानन प्र. शंकरवार)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, महाराष्ट्र राज्य, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
३. मा.राज्यमंत्री, गृह (शहरे), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.राज्यमंत्री, गृह (ग्रामीण), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

६. अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
१०.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा), गृहनिर्माण भवन, वांद्रे (पुर्व), मुंबई.
११. निवड फाईल (पोल-७),गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.